सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती यांचे कार्यालय कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२**
कार्यालयीन दूरध्वनी 2662090 / 2662593. 2662680 (वैयक्तिक), फॅक्स- 2663314
ई-मेल-पत्ता- ccftamravati@mahaforest.gov.in/aticcfa@gmail.com

*क्रमांक/कक्ष-2/महसूल/तेंदू/प्र.क्र.10/ 304 /2022-23* *दिनांक :- 2 /05/2022*

**विषय :** सन 2021-22 या वर्षात ईमारती, बांबू व जळावू ई. मालाच्या लिलाव तारखा निश्चित करणेबाबत.

**संदर्भ :** 1. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-2/महसूल/तेंदू/प्र.क्र.10/1255/21-22,दि.20/08/2021.
2.अपर प्रधान मुख्यवनसंरक्षक(उत्पादन व व्यवस्थापन),म.रा.नागपूर यांचे कार्यालयीन पत्र क्र.कक्ष-16/ए-2/प्र.क्र.10(भाग-2)/21-22/87, दि.25 एप्रिल, 2022.

....

उपवनसंरक्षक (प्रा.) सर्व यांना कळविण्यात येते की, अमरावती वनवृत्तांतर्गत प्रादेशिक वनविभागातील आगारावर, सन 2021-22 या वर्षात ईमारती लाकुड, जळावू लाकुड, बांबू, ईत्यादी मालाचा लिलाव करण्यासाठी, माहे सप्टेंबर-2021 ते ऑगस्ट -2022 पर्यंतच्या कालावधीकरिता या कार्यालयाचे संदर्भिय पत्र अ.क्र.-1 अन्वये, लिलाव तारखा निश्चित करुन ई-लिलाव वेळापत्रक आपले कार्यालयास पाठविण्यात आले होते.

2.0 अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक( उत्पादन व व्यवस्थापन),म.रा.नागपूर यांनी, त्यांचे कार्यालयीन उक्त संदर्भिय पत्र अ.क्र.-2 अन्वये, महाराष्ट्र वनविभागात वनोपज ई-लिलावाची प्रक्रिया दिनांक 14/03/2022 पासून एनआयसी मार्फत सुरु झाली असून NIC, नागपूर यांचे नविन ई-ऑक्शन पोर्टल असल्यामुळे माहे मार्च व एप्रिल 2022 करिता ई-लिलावाचे वेळापत्रक त्यांचे कार्यालयाकडून ठरविण्यात आलेले होते. (त्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.3402,दिनांक 08/03/2022 अन्वये आपणास कळविण्यात आलेले आहे.) तद्नंतर दिनांक 11/04/2022 रोजी ई-ऑक्शन समितीच्या सभेमध्ये झालेल्या निर्णयाप्रमाणे 1 मे,2022 ते 31 मार्च, 2023 पर्यंत ई-ऑक्शनचे नियोजन वनवृत्त स्तरावर करुन वेळापत्रक प्रसिध्द करण्याबाबत सुचित केले आहे.

करिता, उपवनसंरक्षक(प्रा.) सर्व यांना यापत्राव्दारे सुचित करण्यात येत आहे की, **माहे 01 मे, 2022 ते दिनांक 31 मार्च, 2023 पर्यंत ई-लिलावाच्या तारखेचे वेळापत्रक** खालील प्रमाणे राहील याची नोंद घ्यावी. वेळापत्रक आपलेस्तरावरुन प्रसिध्द करण्यात यावे जेणे करुन जास्तीत जास्त वनोपज खरेदीदार/ कंत्राटदारांना ई-लिलावामध्ये भाग घेता येईल त्यामुळे स्पर्धात्मक निविदा बोली प्राप्त होईल. तसेच संदर्भिय पत्र अ.क्र.-1 मध्ये दिलेल्या सुचना पूर्वी प्रमाणे लागू राहिल याची सुध्दा नोंद घ्यावी हि विनंती.

## अमरावती वनवृत्त अंतर्गत वनोपजाचे ई-लिलाव वेळापत्रक

| अ.क्र. | महिना | वनविभाग निहाय लिलाव तारखा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | अमरावती | मेळघाट (प्रा.) परतवाडा | अकोला व बुलडाणा | मेळघाट (प्रा.) परतवाडा |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | मे - 2022 | 1 ते 7 | 8 ते 15 | 16 ते 23 | 24 ते 31 |
| 2 | जुन - 2022 | 1 ते 7 | 8 ते 15 | 16 ते 22 | 23 ते 30 |
| 3 | जुले - 2022 | 1 ते 7 | 8 ते 15 | 16 ते 23 | 24 ते 31 |
| 4 | ऑगस्ट-2022 | 1 ते 7 | 8 ते 15 | 16 ते 23 | 24 ते 31 |
| 5 | सप्टेंबर-2022 | 1 ते 7 | 8 ते 15 | 16 ते 22 | 23 ते 30 |
| 6 | ऑक्टोबर-2022 | 1 ते 7 | 8 ते 15 | 16 ते 23 | 24 ते 31 |
| 7 | नोव्हेंबर-2022 | 1 ते 7 | 8 ते 15 | 16 ते 22 | 23 ते 30 |
| 8 | डिसेंबर-2022 | 1 ते 7 | 8 ते 15 | 16 ते 23 | 24 ते 31 |
| 9 | जानेवारी-2023 | 1 ते 7 | 8 ते 15 | 16 ते 23 | 24 ते 31 |
| 10 | फेब्रुवारी-2023 | 1 ते 7 | 8 ते 15 | 16 ते 21 | 22 ते 28 |
| 11 | मार्च-2023 | 1 ते 7 | 8 ते 15 | 16 ते 23 | 24 ते 31 |

(व्हि.डी.डेहणकर)
**विभागीय वनअधिकारी (दक्षता)**
वनसंरक्षक (प्रा.),अमरावती यांचे कार्या.

प्रति,
**उप वनसंरक्षक (प्रादेशिक)**
**अमरावती वनविभाग/ मेळघाट (प्रा.) वनविभाग, परतवाडा /बुलडाणा वनविभाग/अकोला वनविभाग**

**प्रतिलिपी** :- **(ई-मेलव्दारे)** प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय) यांना माहितीस सविनय सादर.

**प्रतिलिपी** :- **(ई-मेलव्दारे)** प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

**प्रतिलिपी** :- **(ई-मेलव्दारे)** महाव्यवस्थापक, एफ.डी.सी.एम. लि. नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

**प्रतिलिपी** :- **(ई-मेलव्दारे)** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संसाधन उपयोग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

**प्रतिलिपी** :- **(ई-मेलव्दारे)** मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर / यवतमाळ / गडचिरोली / चंद्रपूर यांना माहितीस सस्नेह अग्रेषित.

**प्रतिलिपी** :- विभागीय वनअधिकारी (दक्षता / नियोजन), निर्देशन विभाग, अमरावती यांना माहितीस व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

**प्रतिलिपी** :- सांख्यिकी शाखा, निर्देशन विभाग, अमरावती यांना माहितीस रवाना.

**प्रतिलिपी** :- NIC असि.प्रोगामर, निर्देशन विभाग अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस रवाना

**प्रत- नोटिस बोर्ड.**